**Strictly Confidential: (For Internal and Restricted use only)**
**Secondary School Examination-2020**
**Marking Scheme – MARATHI**
**(SUBJECT CODE : 009) (PAPER CODE :8 )**

**General Instructions: -**

1. You are aware that evaluation is the most important process in the actual and correct assessment of the candidates. A small mistake in evaluation may lead to serious problems which may affect the future of the candidates, education system and teaching profession. To avoid mistakes, it is requested that before starting evaluation, you must read and understand the spot evaluation guidelines carefully.**Evaluation is a 10-12 days mission for all of us. Hence, it is necessary that you put in your best effortsin this process.**
2. Evaluation is to be done as per instructions provided in the Marking Scheme. It should not be done according to one's own interpretation or any other consideration. Marking Scheme should be strictly adhered to and religiously followed. **However, while evaluating, answers which are based on latest information or knowledge and/or are innovative, they may be assessed for their correctness otherwise and marks be awarded to them. In class-X, while evaluating two competency based questions, please try to understand given answer and even if reply is not from marking scheme but correct competency is enumerated by the candidate, marks should be awarded.**
3. The Head-Examiner must go through the first five answer books evaluated by each evaluator on the first day, to ensure that evaluation has been carried out as per the instructions given in the Marking Scheme. The remaining answer books meant for evaluation shall be given only after ensuring that there is no significant variation in the marking of individual evaluators.
4. Evaluators will mark( √ ) wherever answer is correct. For wrong answer 'X"be marked. Evaluators will not put right kind of mark while evaluating which gives an impression that answer is correct and no marks are awarded. **This is most common mistake which evaluators are committing.**
5. If a question has parts, please award marks on the right-hand side for each part. Marks awarded for different parts of the question should then be totaled up and written in the left-hand margin and encircled. This may be followed strictly.
6. If a question does not have any parts, marks must be awarded in the left-hand margin and encircled. This may also be followed strictly.
7. If a student has attempted an extra question, answer of the question deserving more marks should be retained and the other answer scored out.
8. No marks to be deducted for the cumulative effect of an error. It should be penalized only once.
9. A full scale of marks 0-80 has to be used. Please do not hesitate to award full marks if the answer deserves it.
10. Every examiner has to necessarily do evaluation work for full working hours i.e. 8 hours every day and evaluate 20 answer books per day in main subjects and 25 answer books per day in other subjects (Details are given in Spot Guidelines).
11. Ensure that you do not make the following common types of errors committed by the Examiner in the past:-
    - Leaving answer or part thereof unassessed in an answer book.
    - Giving more marks for an answer than assigned to it.
    - Wrong totaling of marks awarded on a reply.
    - Wrong transfer of marks from the inside pages of the answer book to the title page.
    - Wrong question wise totaling on the title page.
    - Wrong totaling of marks of the two columns on the title page.
    - Wrong grand total.
    - Marks in words and figures not tallying.
    - Wrong transfer of marks from the answer book to online award list.

- Answers marked as correct, but marks not awarded. (Ensure that the right tick mark is correctly and clearly indicated. It should merely be a line. Same is with the X for incorrect answer.)
- Half or a part of answer marked correct and the rest as wrong, but no marks awarded.

12. While evaluating the answer books if the answer is found to be totally incorrect, it should be marked as cross (X) and awarded zero (0)Marks.

13. Any unassessed portion, non-carrying over of marks to the title page, or totaling error detected by the candidate shall damage the prestige of all the personnel engaged in the evaluation work as also of the Board. Hence, in order to uphold the prestige of all concerned, it is again reiterated that the instructions be followed meticulously and judiciously.

14. The Examiners should acquaint themselves with the guidelines given in the Guidelines for spot Evaluation before starting the actual evaluation.

15. Every Examiner shall also ensure that all the answers are evaluated, marks carried over to the title page, correctly totaled and written in figures and words.

16. The Board permits candidates to obtain photocopy of the Answer Book on request in an RTI application and also separately as a part of the re-evaluation process on payment of the processing charges.

# MARATHI (009)

## ANSWER KEY

**Class –X** (२०१९–२०) **Marks: 80**

| SECTION-A | | | |
|---|---|---|---|
| **प्रश्न** | **उपप्रश्न** | **अपेक्षित उत्तरे** | **गुणदान** |
| | | **स्वभाषेत उत्तरे अपेक्षित.**<br>**आकलनानुसार विषयानुरूप उत्तर अपेक्षित.**<br>**लेखननियमानुसार व्याकरण घटकात लेखन काटेकोरपणे असावे.** | |
| १. | | **खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | |
| | अ) | **खालील प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | स्वत:बद्दल 'छान' वाटत नाही, समाधान होत नाही, तेव्हा माणूस एक चुकीचा **निष्कर्ष** काढतो. | १ |
| | २ | अस्वस्थ माणसाला **विरंगुळा** हवा असतो. | १ |
| | ३ | **अस्वाभाविक** | १ |
| | ४ | स्वत:ला ओळखणं हे **निरंतर** आनंदासाठी गरजेचे असते. | १ |
| | आ) | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | खरा आनंद अंतरंगात असतो. | १ |
| | २ | मनात डोकवायला हवं. | १ |
| | ३ | स्वरूप जाणणं–स्वत:शी प्रामाणिक राहणं, स्वत:च्या सर्व आंतरिक इच्छा जाणून त्या पूर्ण करणं. | १ |
| | ४ | आंतरिक आनंदाशी तुटलेलं नातं. | १ |
| | इ) | **खालील प्रश्नांची उत्तरे २ ते ३ वाक्यात लिहा.** | |
| | १ | भरपूर सुख, वैभव मिळवूनही जेव्हा माणसाला आनंद मिळत नाही, समाधान होत नाही तेव्हा, अजून काही तरी मिळवलं तरच मी सुखी होईन अशी त्याची गल्लत होते. | २ |
| | २ | विरंगुळा मिळवण्यासाठी बायको मुलात रमायला हवं, मित्रांशी जिवाभावाचं बोलायला हवं, लिहायला हवं, लॅन्डस्केपस् करायला पाहिजे. | २ |
| २ | | **खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | |
| | अ) | **खालील प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | कल्पनाशक्ती ही प्रज्ञावानांची, बुध्दीमत्तांची **मिरासदारी** नाही. | १ |
| | २ | नेत्रदीपक या शब्दाचा अर्थ **मनाला थक्क करणारे.** | १ |
| | ३ | भन्नाट कल्पना आपल्या **उजव्या** मेंदूला सुचतात. | १ |
| | ४ | किर्लोस्कर मासिकाने नवीन उदयोगांसाठी **प्रेरणा** दिली. | १ |
| | आ) | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | काईझेन– अधिक चांगलं. | १ |
| | २ | डोळे व कान उघडे ठेवून खुल्या दिलाने विचार करणाऱ्या कोणालाही कल्पना सुचतात. | १ |
| | ३ | सुचलेल्या कल्पनांचं आपण स्वागत कसं करतो, त्या कशा हाताळतो यावर यश अवलंबून असते. | १ |
| | ४ | किर्लोस्कर मासिकातील परदेश वर्णनं वाचून न्हाव्याला परदेशी जाण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. | १ |
| | इ) | **खालील प्रश्नांची उत्तरे २ ते ३ वाक्यात लिहा.** | |
| | १ | डावा मेंदू तार्किक गणिती पध्दतीने विचार करतो. तर मेंदूच्या उजव्या भागात भन्नाट कल्पना शिजतात हा फरक आहे. | २ |
| | २ | न्हाव्याने अनेक खटपटी करून बोटीवर न्हाव्याची नोकरी मिळवली आणि परदेशी सफर करण्याची आपली इच्छा पूर्ण केली. | २ |
| | | **SECTION-B** | |
| ३. | | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.** | ८ |
| | | **मुद्दे–** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ● विषयज्ञान, तर्कशक्ती, उपयोजन कौशल्य, मुद्देसूद मांडणी. | |
| | | ● आकर्षक प्रारंभ व शेवट. | |
| | | ● म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा यथायोग्य वापर. | |
| | | ● हस्ताक्षर व शुद्धलेखन | |
| | | ● विरामचिन्हांचा यथायोग्य वापर | |
| | | वरील मुद्दयांचा सारासार विचार करून एकत्रित गुणदान करावे. | |
| ४ | अ) | **खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला समर्पक शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** | ७ |
| | | **मुद्दे–** | |
| | | ● कथेला समर्पक शीर्षक | |
| | | ● आकर्षक प्रारंभ. | |
| | | ● ओघवती भाषाशैली, उत्कंठावर्धक मांडणी. | |
| | | ● मुद्देसूद मांडणी कल्पकता, रंजकता. | |
| | | ● संवाद व विरामचिन्हांचा यथायोग्य वापर. | |
| | | ● म्हणी व वाक्प्रचाराचा वापर. | |
| | | ● समर्पक शेवट. | |
| | | ● तात्पर्य. | |
| | | वरील मुद्दयांचा सारासार विचार करून एकत्रित गुणदान करावे. | |
| | | **किंवा** | |
| | आ) | **खालील विषयावर बातमी लेखन करा.** | |
| | | ● समर्पक शीर्षक. | |
| | | ● दिनांक, स्थळ, कालावधी, संबंधित व्यक्तींचा योग्य उल्लेख. | |
| | | ● सोपी, सुटसुटीत वाक्यरचना. | |
| | | ● अचूक व योग्य तपशील, तटस्थ भूमिकेतून लेखन. | |
| | | ● विरामचिन्हांचा योग्य वापर. | |
| | | **टीप–** बातमीतील विषयानुसार लिखाणात काळाचा वापर करावा. उदा. – घडून गेलेल्या घटनेविषयी बातमी असेल तर, भूतकाळाचा वापर व भविष्यातील सूचनांसंबंधी बातमी असल्यास भविष्यकाळाचा वापर करावा. | |
| | आ) | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | ५ |
| | | पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी – | |
| | | ● दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा. | |
| | | ● मायना – ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे. | |
| | | ● विषय – मोजक्या शब्दात असावा. | |
| | | ● मजकूर – मजकूर विषयाशी संबंधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना असावी, पाल्हाळ नसावे, भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी. | |
| | | ● शेवट व स्वाक्षरी – पत्राचा शेवट करताना डावीकडील खालच्या कोपऱ्यात पत्र पाठवणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता असावा. | |
| | | ● **टीप –** लिफाफा आवश्यक. | |
| | | **SECTION-C** | |
| ५ | अ) | **सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही चार)** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १ | तो – सर्वनाम | १ |
| | २ | लहान – विशेषण | १ |
| | ३ | पूर्ण केले – क्रियापद | १ |
| | ४ | वर – शब्दयोगी अव्यय | १ |
| | ५ | म्हणून – उभयान्वयी अव्यय | १ |
| | ६ | क्षणात/एका क्षणात – क्रियाविशेषण अव्यय | १ |
| | **आ)** | **सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | विनय गावी जाणार/जाईल/जात असेल/गेला असेल/जात राहिल. | १ |
| | २ | गीताने काम केले असेल. –भविष्यकाळ | १ |
| | ३ | सविता पुस्तक आणते/आणते आहे/आणत असते/आणले आहे/आणणार आहे. | १ |
| | ४ | तिला फुले आवडायची/आवडली/आवडत होती/आवडणार होती/आवडली होती/आवडत असत. | १ |
| | ५ | पावसात खेळताना मजा येते. – वर्तमानकाळ | १ |
| | **इ)** | **पुढील वाक्ये कंसातील सूचनेनुसार लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | बाप रे/आई गं/बाई गं/अरेरे! पुराचे पाणी त्याच्या घरात शिरले./**किंवा** किती/केवढे पाणी शिरले त्याच्या घरात पुराचे! | १ |
| | २ | नागरिकांनो रस्त्यावर घाण करू नका. | १ |
| | ३ | मी दिलेले पुस्तक तुला आवडले आहे ना?/आवडले नाही ना?/आवडले का?/आवडले नाही का?/मी दिलेले पुस्तक तुला आवडले नाही?/आवडले आहे ना?/आवडले ना? | १ |
| | ४ | नेहमी स्वच्छ कपडे घालावे./स्वच्छ कपडे नेहमी घालावेत/घातले पाहिजेत. | १ |
| | ५ | तुमच्या मदतीमुळे आमची गैरसोय झाली नाही. | १ |
| | **ई)** | **सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १ | सुखदा घरी गेली. – कर्तरी प्रयोग | १ |
| | २ | शुभमने नवीन घर बांधले. – कर्मणी प्रयोग | १ |
| | ३ | सैन्याने शत्रूला घेरले. – भावे प्रयोग | १ |
| | ४ | गाडी खूप सावकाश जाते. – कर्तरी प्रयोग | १ |
| | **उ)** | **लिंग बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १ | मांजर – बोका/मांजरी/मांजरीण/भाटी | १ |
| | २ | लोटा – लोटी | १ |
| | ३ | जनक – जननी | १ |
| | ४ | सोनार – सोनारीण | १ |
| | **ऊ)** | **वचन बदला. (कोणतेही दोन)** | |
| | १ | वही – वहया | १ |
| | २ | माशी – माश्या/माशा | १ |
| | ३ | पक्षी – पक्षी | १ |
| | ४ | पोहा – पोहे | १ |
| | **ए)** | **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १ | दासी – सेविका | १ |
| | २ | भूक – क्षुधा/बुभुक्षा/अन्नाची ऊब/पोटाची आग | १ |
| | ३ | माता – आई /माय/माऊली/जन्मदात्री/जननी | १ |
| | ४ | कान – कर्ण/श्रवणेंद्रिय | १ |
| | **ऐ)** | **विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १ | सुशिक्षित – अशिक्षित | १ |
| | २ | मान – अपमान/अवमान | १ |
| | ३ | आदर – अनादर | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४ | जलद – सावकाश/हळू/संथ/मंद/हळूहळू | १ |
| | | **SECTION-D** | |
| ६ | **अ)** | **योग्य पर्याय शोधून उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी **चाचणी परीक्षा** घेण्यात येत असे. | १ |
| | २ | साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार **वि.स. खांडेकर** यांच्या 'ययाति' या कादंबरीला मिळाला. | १ |
| | ३ | लिंबाचा रस तर मला **अमृतासारखा** वाटू लागला. | १ |
| | ४ | शालीमुळे शालीनता येते की जाते? या प्रश्नाचे माझे उत्तर **जाते** असेच आहे. | १ |
| | ५ | नाही रे बाळा, तू **उत्तम** नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास. | १ |
| | **आ)** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन)** | |
| | १ | डॉ. माशेलकरांनी 'माझे संस्कार केंद्र' त्यांची शाळा, शिक्षक व स्वत:च्या आईला म्हटले आहे. | १ |
| | २ | सोकाजी त्रिलोकेकरने पंतांना बटाटा सोडण्याचा सल्ला दिला. | १ |
| | ३ | लेखकाने दिलेल्या शाली म्हाताऱ्याने विकल्या व त्या पैशातून दोन–तीन दिवस पोटभर जेवला. | १ |
| | ४ | निरंजनचा नागरिकशास्त्र या विषयाचा पेपर चुकला होता. | १ |
| | ५ | कवी कुसुमाग्रजांचा/वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस म्हणून मराठी दिन २७ फेब्रुवारीला साजरा करतात. | १ |
| | ६ | संक्रांत व ज्येष्ठ पौर्णिमेला अब्दुल तपोवनामध्ये जात असे. | १ |
| ७ | | **३० ते ४० शब्दात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन)** | |
| | १ | 'फूटप्रिन्टस' डॉ. प्रदिप आवटे ग्लोबल वॉर्मिंगमधून धरणीमातेला वाचविण्याचा संदेश.....<br>सुमितने फूटप्रिन्टस नावाचे स्वच्छता ॲप तयार केले. माणसाच्या रोजच्या जीवनशैलीची माहिती दिल्यावर त्या माणसाकडून रोज किती कार्बन वातावरणात सोडला जातो, ते मोजतं. ॲपवर सर्व माहिती दिल्यावर स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराच्या निळया चौकोनात चंदेरी किंवा काळी फूटप्रिन्टस् उमटतात व शेरा दिला जातो/निष्कर्ष काढला जातो. | २ |
| | २ | रंग साहित्याचे या पाठात सर्व मराठी साहित्यप्रकारांची ओळख करून दिली आहे.<br>कादंबरी कथेची थोरली <u>बहिण, कथेपेक्षा</u> आवाका मोठा, खूप पात्रे, विविध घटना, प्रसंगातून हळूहळू कथानक उलगडते. वाचकाची उत्कंठा वाढवते. वाचक रममाण होतात. | २ |
| | ३ | 'उपास' पु. ल. देशपांडे यांनी मध्यमवर्गीय व्यक्तीच्या संकल्पाचे मजेदार चित्रण......<br>पंतांच्या उपासाच्या व्रताच्या दुसऱ्या दिवशी अण्णा नाडगौडाने प्रमोशनची पार्टी सेक्शनला दिली. कॅन्टीनच्या आचाऱ्याने खूप गोड मिठाई बनवली होती. बटाटे वडे, वनस्पतीतला चिवडा शिवाय भजी असा मेनू व आग्रह यामुळे पंतांचा व्रतभंग झाला. | २ |
| | ४ | 'शाल' रा. ग. जाधव 'शाली' विषयीच्या लेखकाच्या आठवणी वर्णन......<br>लेखकाने त्यांना मिळालेली 'पुलकित' शाल वाई येथे थंडीत कुडकुडणाऱ्या बाईच्या बाळाला दिली. त्यामुळे त्याला थंडीत ऊब मिळाली. त्यांना मिळालेल्या सन्मानाच्या शालीतील दोन शाली त्यांनी अशक्त भिक्षेकऱ्याला थंडीपासून बचावासाठी दिल्या; पण त्याने त्या विकून पोटाची आग शमवली. आपल्या शाली लोकांच्या उपयोगी पडल्याचे लेखकाला समाधान मिळाले. | २ |
| | ५ | 'चुडीवाला' जयश्री रूईकर यांनी माणूसकीचे दर्शन पाठाच्या आधारे घडवले आहे.<br>अब्दुल हा अत्यंत संवेदनशील वृत्तीचा गृहस्थ. स्वत:ची आर्थिक स्थिती चांगली नसतांना देखील तो आपल्या व्यवसायाची पर्वा न करता तपोवनात जात असे. समाजाने उपेक्षिलेल्या तपोवनातील स्त्रिया व मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून त्याला समाधान वाटे. दुसऱ्याला आनंद देण्यासाठी धडपडणारा, परोपकारी वृत्तीचा व समाजऋणाचा दृष्टीकोन असणारा अब्दुल. | २ |
| ८ | **अ)** | **योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | १ | अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण; **दीनदुबळयांचे** असे तुला एकच औक्षण. | १ |
| | २ | भाकरीचा **चंद्र** शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३ | <u>**अग्निमाजि**</u> पडे बाळू। माता धावे कनवाळू।। | १ |
| | ४ | नव्या पिढीचे, नव्या <u>**युगाचे**</u> स्वप्न करू साकार।। | १ |
| | **आ)** | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** | |
| | १ | नारायण सुर्वे डोईवर किती उन्हाळे राहिलेत याचा हिशोब करतात. | १ |
| | २ | इंदिरा संतांना डोळे भरून जवानाच्या/सैनिकाच्या विजयाची दौड पाहावीशी वाटते. | १ |
| | ३ | पाण्याने केवळ शरीर स्वच्छ होते पण योगी पुरूषाच्या सहवासाने शरीराबरोबर मनाचीही शुध्दी होते; म्हणून निर्मळ करण्याच्या बाबतीत पाण्यापेक्षा योगी श्रेष्ठ आहे. | १ |
| | ४ | फुला मुलांतून श्रावण हसतो. | १ |
| | ५ | संत नामदेवांनी स्वत:ला चातक म्हटले आहे. | १ |
| | ६ | कवी किशोर पाठक यांना या देशाच्या उज्ज्वल भविष्याचा जयजयकार करायचा आहे. | १ |
| ९ | | **खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** | |
| | १ | 'स्वप्न करू साकार' या कवितेत कवी किशोर पाठक यांनी एकजुटीचे सामर्थ्य पटवून देतांना वरील ओळी लिहिल्या आहेत.<br>देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न, शेती, श्रम यांना प्रतिष्ठा (मान) मिळावी यासाठी नवी पिढी झटणार आहे. तिला एकीचे बळ, सामर्थ्य माहीत आहे. त्यामुळे आता या नव्या युगात घराघरातून सामर्थ्यशाली बालके जन्मास येतील असे कवीला वाटते. | २ |
| | २ | 'दोन दिवस' या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना वरील ओळी लिहिल्या आहेत.<br>चंद्र, चांदणे एखादया कवीसाठी सृजनशीलतेची प्रतिके.....हीच प्रतिके कवीने वास्तवाशी जोडली....... कष्टकऱ्यांच्या जीवनातील दाहक सत्य, त्यांचा सोशिकपणा संयम वाचकांसमोर मांडला आहे. | २ |
| | ३ | 'अंकिला मी दास तुझा' या अभंगात संत नामदेवांनी परमेश्वर कृपेची याचना करताना वरील <u>चरण/ओळी</u> लिहिल्या आहेत.<br>भुकेलेले वासरू पाहून गाय आपल्या वासरासाठी हंबरत धावत येते.....त्याप्रमाणे 'हे देवा, तू माझ्या प्रत्येक कार्यात, संकटात, अडचणींमध्ये धावून यावे' अशी संत नामदेवांनी विनवणी केली आहे...... मातृप्रेमाची उत्कटता वरील ओळीतून व्यक्त होते. | २ |
| १० | | **योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा.** | |
| | **अ)** | 'स्काय इज द लिमिट', असे <u>**डॉ. अनिल काकोडकर**</u> म्हणाले. | १ |
| | **आ)** | <u>'दार'</u> हा शब्द **फारसी** आहे. | १ |
| | | **किंवा** | |
| | | **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| | १ | अनेक शब्दांच्या व्युत्पत्तीच्या संग्रहास व्युत्पत्ती कोश असे म्हणतात | १ |
| | २ | 'बार्क' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र'/भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर या नावाचे लघुरूप होय. | १ |

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------